**महाराष्ट्र शासन**
**नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग**
**मध्यवर्ती इमारत, पुणे - ४११ ००१.**

फो.नं. ०२०-२६१२२०७६ email: ddtp.ho@maharashtra.gov.in
फॅक्स-०२०/२६१२७०४१ email: do_tpv6@rediffmail.com

व.लि.
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
उपसंचालक, नगर रचना (ना.सं.घ.)
आ.क्र. 208 दिनांक- 06.02.25
संबधित अधि./कर्म.
web publication
न.र. 06/02/25 6-2-25 उ.स.न.र. 6/2

**विकास योजना-दारव्हा, जि. यवतमाळ.**
दारव्हा शहराच्या विकास आराखड्यातील स. नं. ७१/३ अ मधील आरक्षण क्र. १ "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान" या आरक्षणाखालील जमिनीबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६, चे कलम-१२७(२) नुसार आरक्षण भागशः व्यपगत झाल्याने आदेश निर्गमित करणेबाबत.

**आदेश क्र.**: डि.टी.पी./वि.यो. दारव्हा (सु.)(ई.पी.)/कलम १२७(२)/आदेश/टिपीव्ही-६/ ५५५ ,
दि. ०४ .०२.२०२५

सोबतचे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित केलेले आदेश (मराठी व इंग्रजी भाषेत) महाराष्ट्र शासन राजपत्र, अमरावती विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करण्यात यावेत.

(मसूदा मा. संचालक यांनी मंजूर केला असे)

**(श. म. निकम)**
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकरिता.

**प्रति,**

व्यवस्थापक, शासकीय मुद्रणालय, नागपूर.

/- त्यांना कळविण्यात येते की, सोबतचे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांनी निर्गमित केलेले आदेश (मराठी व इंग्रजी भाषेत) महाराष्ट्र शासन राजपत्र, अमरावती विभागीय पुरवणीमध्ये प्रसिध्द करुन त्यांच्या **५ छापील प्रती** नगर रचना संचालनालयास व **प्रत्येकी २ छापील प्रती** सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती आणि सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा, यवतमाळ यांना पाठवाव्यात.

(कृ.मा.प.)

**प्रत माहितीस्तव:-**

१. मा. अपर मुख्य सचिव (१), नगर विकास विभाग (नवि-३०), मंत्रालय, मुंबई -३२ यांना सादर.

२. सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती.

३. विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.

४. जिल्हाधिकारी, यवतमाळ.

**प्रत माहितीस्तव व कार्यवाहीस्तव:-**

५. उपसंचालक नगर रचना, नागरी संशोधन घटक, मुख्य कार्यालय, पुणे.

/- त्यांना कळविण्यात येते की, त्यांनी सदरचे आदेश त्यांचेकडील त्यासंबंधीच्या संकलन नस्तीमध्ये अभिलेखार्थ जोडावेत. तसेच सदरचे आदेश संचालनालयाच्या अधिकृत संकेत स्थळावर देखील प्रसिध्द करावेत.

६. सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा, यवतमाळ.

/- प्रस्तुत प्रकरणी त्यांना कळविण्यात येते की, प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने संचालनालयाकडून अधिप्रमाणित करावयाच्या भाग नकाशाच्या **पाच प्रती** ह्या संचालनालयाकडून वेळोवेळी केलेल्या मार्गदर्शक सूचनांना अनुसरून तयार करून, त्या संचालनालयास विहीत मार्गाने सादर कराव्यात.

७. मुख्याधिकारी, नगर परिषद, दारव्हा, जि.यवतमाळ.

८. प्रमुख आरेखक, रेखाकला विभाग, मुख्य कार्यालय, पुणे यांनी सदर आदेशानुसारचा फेरबदल मुख्य कार्यालयातील विकास योजना नकाशावर दर्शवून तो अद्ययावत करावा.

९. अर्जदार श्री. अली मंहमद गणी महंमद निर्बाण, रा. रेल्वे स्टेशन, दारव्हा, ता. दारव्हा जि.यवतमाळ ४४५ २०२.

महाराष्ट्र शासन
नगर रचना आणि मूल्यनिर्धारण विभाग
मध्यवर्ती इमारत, पुणे- ४११ ००१.

# आदेश

क्र.डि.टी.पी./वि.यो.दारव्हा(सु.)/कलम-१२७(२)/आदेश/टिपीव्ही-६/ ५५५ दि. ०४.०२.२०२५

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६.**

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्र. ३७) (यापुढे "**उक्त अधिनियम**" असे संबोधिले आहे) चे कलम ३१(१) चे तरतुदीन्वये दारव्हा या नगर परिषदेची सुधारीत विकास योजना शासनाच्या नगर विकास विभागाकडील अधिसूचना क्र.टिपीएस-२७०२/६०१/ सीआर-१०६(बी)/२००२/युडी-३०, दि.१३.०७.२००५ (यापुढे "**उक्त अधिसूचना**" असे संबोधिले आहे) अन्वये मंजूर केली आहे व ती दि.०१.०९.२००५ पासून अंमलात आलेली आहे (यापुढे " **उक्त मंजूर सुधारीत विकास योजना**" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर सुधारित विकास योजनेमध्ये, मौजा दारव्हा येथील स.नं. ७१ या जमिनीचे अंदाजे ०.८४ हे. क्षेत्र हे आ. क्र. १ "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान" (यापुढे "**उक्त आरक्षण**" असे संबोधिले आहे) या आरक्षणाने बाधित होत आहे आणि उक्त आरक्षणाचे भूसंपादन व विकासासाठी समुचित प्राधिकरण हे नगर परिषद, दारव्हा आहे (यापुढे "**उक्त समुचित प्राधिकरण**" असे संबोधिले आहे);

आणि ज्याअर्थी, उक्त समुचित प्राधिकरणाने उक्त मंजूर सुधारित विकास योजना अंमलात आल्याच्या दिनांकापासून १० (दहा) वर्षाच्या कालावधीत उक्त आरक्षणाखालील जमीन संपादन केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, मौ. दारव्हा, येथील स.नं. ७१/३अ, या जमिनीचे (यापुढे "**उक्त जमीन**" असे संबोधिले आहे) अनुषंगाने उक्त आरक्षणाने बाधित क्षेत्राबाबत संबंधित जमीन मालकांनी (यापुढे "**उक्त जमीन मालक**" असे संबोधिले आहे) उक्त अधिनियमाचे कलम १२७(१) चे तरतुदी अन्वये उक्त समुचित प्राधिकरणावर दि. २७.०६.२०२२ रोजी सूचना (यापुढे "**उक्त सूचना**" असे संबोधिले आहे) बजावलेली असून, ती उक्त समुचित प्राधिकरणास त्याच दिवशी प्राप्त झाली होती;

आणि ज्याअर्थी, उक्त जमीन मालक ह्यांनी उक्त सूचना बजाविल्याच्या दिनांकानंतर उक्त समुचित प्राधिकरणाने विहित मुदतीत उक्त आरक्षणाखालील उक्त जमीन संपादित केलेल्या नाहीत अथवा उक्त जमिनीचे भूसंपादन करण्यासंबंधी उक्त अधिनियमाच्या कलम १२७(१) मधील तरतूदीनुसार आवश्यक ती उपाययोजना केलेली नाही;

आणि ज्याअर्थी, मुख्याधिकारी, नगर परिषद दारव्हा यांनी उक्त सूचनेस अनुसरुन उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे तरतूदी अंतर्गत आदेश निर्गमित करणेबाबतचा प्रस्ताव दि. ०१.०८.२०२४ रोजीचे पत्र क्र. ८६३/२०२४ अन्वये विहित मार्गाने सादर केला आहे व त्यामध्ये प्रामुख्याने नमूद केले आहे की, उक्त आरक्षणाचे अनुषंगाने अन्य सुचनाकर्ते यांनी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे नागपूर खंडपीठात दाखल केलेल्या याचिका क्र. ३५७४/२०२२ मध्ये नगर परिषदेकडून सादर केलेल्या प्रतिज्ञापत्रात नगर परिषदेकडे जमीन खरेदी करण्यासाठी निधी नसल्याचे स्पष्टीकरण दिलेले आहे;

आणि ज्याअर्थी, सहसंचालक, नगर रचना, अमरावती विभाग, अमरावती यांनी पत्र क्र. ८४३, दि. ०१.१०.२०२४ अन्वये अहवाल सादर केलेला आहे व त्यामध्ये प्रामुख्याने, उक्त आरक्षणाने मौ. दारव्हा, स. क्र. ७१ चे मोजणी नकाशानुसार, ७१/३अ व ७१/३ब ह्या दोन्ही हिश्याची जमीन बाधित होत असून, स. क्र. ७१/३ब या हिश्याचे ४४२५ चौ.मी. क्षेत्रावरील उकत आरक्षण उपरोक्त नमूद याचिकेतील दि. ०२.०३.२०२३ रोजीचे निर्णयान्वये मा. उच्च न्यायालयाने व्यपगत झाल्याचे घोषीत केले आहे व आता, उक्त सूचनेस अनुसरून स. क्र. ७१/३अ या हिश्याचे ३९७५ चौ.मी. क्षेत्रावरील उकत आरक्षण व्यपगत ठरते, असे नमूद करून, उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे तरतुदीन्वये संचालनालयाचे स्तरावरून आदेश निर्गमित करणेबाबत अभिप्राय सादर केले आहेत;

आणि ज्याअर्थी, उक्त जमिनीचा मोजणी नकाशा व सहायक संचालक, नगर रचना, यवतमाळ शाखा कार्यालयाने प्रकरणी सादर केलेल्या भाग नकाशाची संचालनालयाचे स्तरावरून पडताळणी केली असता, उक्त आरक्षणाने उक्त जमिनीचे २७२० चौ.मी. क्षेत्र बाधित असल्याचे स्पष्ट होत आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षणाबाबतची उपरोक्त नमूद वस्तुस्थिती पाहता, उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे तरतुदीन्वये उकत जमिनीचे बाधित २७२० चौ.मी. (०.२७२० हे.) क्षेत्रावरील उक्त आरक्षण भागशः व्यपगत झाल्याबाबतचे आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे, असे संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे मत झाले आहे;

आणि ज्याअर्थी, शासनाच्या नगर विकास विभागाकडील निर्णय क्र.टिपीएस-१८१३/३२११/ प्र.क्र.५०८/नवि-१३, दि.०१.१२.२०१६ अन्वये नियोजन प्राधिकरण असलेल्या सर्व नगर परिषदा/नगर पंचायती / जिल्हा परिषद यांच्या विकास योजना संबंधाने, उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे

तरतुदीन्वये कार्यवाही करण्याचे शासनाचे अधिकार कलम १५१ चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना प्रदान केलेले आहेत;

त्याअर्थी, आता उक्त अधिनियमाचे कलम १२७(२) चे तरतुदीन्वये संचालक, नगर रचना, महाराष्ट्र राज्य, पुणे हे, या आदेशाद्वारे पुढील परिशिष्टात नमूद केल्याप्रमाणे उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील उक्त जमिनीवरील उक्त आरक्षण भागशः व्यपगत झाले आहे, असे अधिसूचित करीत आहेत आणि त्यासाठी उक्त मंजूर सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेमध्ये पुढीलप्रमाणे सुधारणा करीत आहेत;

उक्त मंजूर सुधारित विकास योजनेच्या उक्त अधिसूचनेच्या बदलाच्या परिशिष्टामधील शेवटच्या नोंदीनंतर पुढील नविन नोंदीचा समावेश करण्यात येत आहे :-

**परिशिष्ट**

| अ. क्र. | नगर परिषद मौजा, तालुका व जिल्हा | उक्त मंजूर सुधारित विकास योजनेतील आरक्षण व त्याचे वि.यो. अहवालानुसार अंदाजे क्षेत्र | उक्त जमिनीचा तपशील | उक्त आरक्षणाचे व्यपगत झालेले अंदाजे क्षेत्र (चौ.मी.) |
|---|---|---|---|---|
| १. | दारव्हा नगर परिषद- मौजा दारव्हा, ता.दारव्हा, जि.यवतमाळ. | आ.क्र.१ "प्राथमिक शाळा व खेळाचे मैदान" क्षेत्र-०.८४ हे.* (८४०० चौ.मी.) | स. नं. ७१/३ अ (भाग) | २७२० चौ.मी. |
| | | * उक्त आरक्षणाचे एकूण अंदाजे ८४०० चौ.मी. क्षेत्रापैकी संचालनालयाकडून यापूर्वी दि. ०७.०२.२०२४ रोजीचे पत्र क्र. ९२९ अन्वये अन्य स.नं. ७१/३ ब (भाग) या जमिनीचे ४४२५ चौ.मी. क्षेत्रावरील उक्त आरक्षण भागशः व्यपगततेसंदर्भाने आदेश पारित केले आहेत. | | |

**टिप**:-१. उक्त आरक्षणातून मुक्त झालेली उक्त जमीन ही लगतच्या जमिनींवर उक्त मंजूर सुधारित विकास योजनेनुसार अनुज्ञेय होणाऱ्या विकासाच्या प्रयोजनासाठी उक्त जमीन मालकांना उपलब्ध होईल.

२. उक्त आरक्षणातून मुक्त झालेल्या उक्त जमिनीचे क्षेत्र दर्शविणारा उक्त मंजूर सुधारित विकास योजनेचा भाग नकाशा हा मुख्याधिकारी, दारव्हा नगर परिषद, दारव्हा, जि. यवतमाळ यांच्या कार्यालयात, कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत, नागरिकांच्या अवलोकनार्थ एक महिन्यापर्यंत खुला ठेवण्यात येत आहे.

३. सदर आदेश संचालनालयाचे **www.dtp.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येत आहे.

(अविनाश भा. पाटील)
संचालक, नगर रचना,
महाराष्ट्र राज्य, पुणे.

**Maharashtra State**
**Directorate of Town Planning & Valuation**
**Central Building, Pune- 411 001**

# ORDER

No. D.T.P/ D.P.Darwha(R)/Sec-127(2)/Order/TPV-VI/ 555 Date : 04 .02.2025

**Maharashtra Regional and Town Planning Act, 1966.**

Whereas, the Development Plan of Darwha Municipal Council (Revised) has been sanctioned as per the provisions of section 31 (1) of the Maharashtra Regional & Town Planning Act, 1966 (Maharashtra Act No. XXXVII of 1966) (hereinafter referred to as "**the said Act**") by the Government in Urban Development Department vide its Notification No. TPS-2702/601/CR-106(B)/2002/UD-30, Dated 13.07.2005 (hereinafter referred to as "**the said Notification**") & came into force with effect from dated 01.09.2005 (hereinafter referred to as the "**said Sanctioned Revised Development Plan**")

And whereas, in the said Sanctioned Revised Development Plan, the land bearing S.No. 71 admeasuring an approximate area 0.84 Ha. of Mauza Darwha is affected by the Reservation Site No. 1 "Primary School & Play Ground" (hereinafter referred to as "**the said Reservation**"). The Appropriate Authority for the acquisition and development of the said Reservation is Municipal Council, Darwha (hereinafter referred to as "**the said Appropriate Authority**");

And whereas, the land under said Reservation has not been acquired by the said Appropriate Authority within 10 (ten) years from the date on which the said Sanctioned Revised Development Plan came into force;

And whereas, the concerned Land Owners (hereinafter referred to as "**the said Land Owners**"), in respect of the land bearing S.No. 71/3A, of Mouza Darwha (hereinafter referred to as "**the said Land**"), had served a notice dated 27.06.2022 for affected area by the said Reservation as per the provisions of section 127(1) of the the said Act, (hereinafter referred to as "**the said Notice**") which was received by the said Appropriate Authority on same day;

And whereas, the said Land under the said Reservation is not acquired or no steps for acquisition of the said land as required as per the provisions of section 127(1) of the said Act have been taken by the said Appropriate Authority, within a stipulated period after the date of service of the said Notice ;

And whereas, the proposal of the Chief Officer, Municipal Council, Darwha for issuing the order under the provisions of section 127(2) of the said Act in respect of the said Notice vide letter No. 863/2024, dt.01.08.2024 & mentioned therein that, Municipal Council has given explaination in the affidavit filed before the Hon'ble High Court, Mumbai, Bench at Nagpur in the Writ Petition No. 3574/2022 filed by another Noticee in respect of the said Reservation that, no fund is available with Municipal Council for purchase of land;

And whereas, the Joint Director, Town Planning, Amaravati Division, Amaravati has submitted a report vide Letter No. 843, dt. 01.10.2024 & mentioned mainly therein that, as per the Measurement Plan of S. No. 71 of Mouja Darwha, Hissa No. 71/3A & 71/3B, both are affected by tha said Reservation and the Hon'ble High Court vide Judgement dt. 02.03.2023 in the above mentioned Writ Petition, has declaired the said Reservation on area admeasuring 4425 Sq,mt. is lapsed in respect of Hissa No. 71/3B and now, the said Resrvation on area admeasuring 3975 Sq.mt. is lapsed & has given opinion, to issue an order under the provisions of the section 127(2) of the said Act on Directorate level;

And whereas, on verification of the Measurement Plan of the said Land & the Part Plan submitted by the Assistant Director, Town Planning, Yavatmal Branch at Directorate level, it is clered that, the area admeasuring 2720 Sq.mt. of the said Land is affected by the said Reservation;

And whereas, after considering the above facts in respect of the said Reservation on the said Land in the said Sanctioned Revised Development Plan, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune is of the opinion that, it is necessary to issue the order as per the provisions of section 127(2) of the said Act, regarding the lapsing of the said Reservation partly on the area admeasuring approximately 2720 Sq. mt. (0.2720 Ha.) of the said Land;

And whereas, the Government in Urban Development Department as per the provisions of section 151 of the said Act, vide Resolution No.TPS-1813/3211/CR-508/UD-13, dated 01.12.2016, has delegated the powers exercisable by it as per the provisions of section 127 (2) of the said Act, in respect of Development Plans of all Municipal Councils / Nagar Panchayat and for

the development plans undertaken by Zilla Parishad as a Planning Authority, to the Director of Town Planning, Maharashtra State, Pune;

Now therefore, the Director of Town Planning, Maharashtra State, Pune, by this order and as specified in the Schedule hereinafter hereby notify the lapsing of the said Reservation partly in respect of the said Land as per the provisions of section 127(2) of the said Act & for that purpose amends the said Notification of the said Sanctioned Revised Development Plan, as follows-

After the last entry in the Schedule of Modifications accompanying the said Notification of the said Sanctioned Revised Development Plan, the following new entry shall be added:-

**SCHEDULE**

<table>
<tr><th>Sr. No.</th><th>Municipal Council Mouza, Taluka and District</th><th>Reservation in the said Sanctioned Revised Development Plan & its Approxi. Area as per D.P. Report</th><th>Description of the said Land</th><th>Approximate Area of the the said Reservation Lapsed (Sq. mt.)</th></tr>
<tr><td rowspan="2">1</td><td rowspan="2">Darwha Municipal Concil- Mouza Darwha, Taluka-Darwha, Dist.- Yavatmal.</td><td>Site No. 1 "Primary School & Play Ground " 0.84 Ha.* (8400 Sq.mt. )</td><td>S.No. 71/3A (Part)</td><td>2720 Sq. mt.</td></tr>
<tr><td colspan="3">* The Directorate has issued previously an order vide letter No. 929, dt. 07.02.2024 in respect of lapsing of the said Reservation partly on area admeasuring 4425 Sq.mt. of the other land bearing S. No. 71/3 B (Part) out of total area admeasuring approximately 8400 Sq.mt. of the said Reservation.</td></tr>
</table>

**Note:-** 1. The said Land so released from the said Reservation shall become available to the said Land Owners for the purpose of development as otherwise permissible in the case of adjacent lands under the said Sanctioned Revised Development Plan.

2. A copy of the part plan of the said Sanctioned Revised Development Plan showing the area of the said Land which is lapsed from the said Reservation, is available in the office of the Chief Officer, Municipal Council, Darwha, District Yavatmal during office hours on all working days for inspection to public upto one month.

3. This Order shall also be published on the Directorate's official website **www.dtp.maharashtra.gov.in**.

**(Avinash B. Patil)**
Director of Town Planning,
Maharashtra State, Pune.